महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
**रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
नवीन प्रशासकीय इमारत क्र.२, ६ वा माळा, बी-विंग, आयुक्त कार्यालय परीसर, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
दूरध्वनी : 0712 2569926 ई-मेल : dos.maha.admn@gmail.com संकेतस्थळ : www.mahasilk.maharashtra.gov.in

जा.क्र.रेशीम/कार्या-08/महारेशीम अभि.2026 मुदतवाढ/ 2025-26/ 329 दिनांक :- 20/03/2026

24 MAR 2026

प्रती,

1) उपसंचालक, प्रादेशीक रेशीम कार्यालय, औरंगाबाद
2) सहायक संचालक,प्रादेशीक रेशीम कार्यालय, नागपूर, अमरावती, पुणे
3) रेशीम विकास अधिकारी,श्रेणी 1/2
जिल्हा रेशीम कार्यालय, सर्व

**विषय :- "महारेशीम अभियान-2026" राबविणेसाठी मुदतवाढ वाढविणे बाबत.**

संदर्भ :- १) शासन निर्ण क्र. केंपूयो २०१७/प्र.क्र.७/रेशीम कक्ष, मंत्रालय, मुंबई दि. ६ मार्च २०१७
२) शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक : धोरण २०१७/प्र.क्र६/टेक्स-५ दिनांक १५/०२/२०१८
३) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक: प्राविधो-१०१८/प्र.क्र.११८/रेशीम कक्ष दिनांक १२/१२/२०१८
४) शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण२०२३/ प्र.क्र.८१/टेक्स-५ दिनांक ०२/०६/२०२३
५) संचालनालयाचे पत्र क्र रेशीम/कार्या-०८ महारेशीमअभि- २०२६/राबविणे/मान्यता/२०२५-२६/११६८ दिनांक २०/११/२०२५ व ६४ दिनांक २७/०१/२०२६
६) शासन निर्णय क्रमांक सपववि-४००१२/९/२०२६-DESKSERICULTURE-CMTD/ रेशीम कक्ष दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६
७) शासन निर्णय क्रमांक सपववि-४००१२/९/२०२६-DESKSERICULTURE-CMTD/ रेशीम कक्ष दिनांक २० मार्च २०२६

राज्याचे वस्त्रोद्योग धोरण-२०२३-२८ अन्वये रेशीम शेती व त्या आधारीत पुरक उद्योगाला प्रोस्ताहन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच संदर्भिय शासन निर्णयानुसार रेशीम शेती व उद्योग विकास प्रचार व प्रसिध्दी योजनेला मान्यता असून राज्यात महारेशीम अभियान राबविण्यात येवून राज्यव्यापी प्रचार व प्रसिध्दी करण्यात येते.

संचालनालयाचे सदंर्भिय पत्र क्र ५ अन्वये **"महारेशीम अभियान" २०२६** राबविण्याकरीता शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. त्यास सदंर्भिय क्र ६ चे शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त आहे.

सन २०२६ मध्ये तुती लागवड व टसर रेशीम लाभार्थ्यांची नाव नोंदणी करण्यासाठी **"महारेशीम अभियान" २०२६** अंतर्गत **मराठवाडा विभाग** - बीड, जालना, नांदेड, हिंगोली **अमरावती विभाग**- अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलढाना **नागपूर विभाग** - नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा **पुणे विभाग** - नाशीक, जळगांव, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर,पालघर या २१ जिल्हयामध्ये दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ पासून ते दिनांक ०५ मार्च २०२६ पर्यंत या कालावधीत तसेच **पुणे विभाग**- रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर **मराठवाडा विभाग**- छ.संभाजी नगर, परभणी, धाराशिव व लातूर या जिल्हयामध्ये दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ते दिनांक ११ मार्च २०२६ या कालावधीत महारेशीम अभियान -२०२६ राबविण्यात येणेबाबत सुचित करण्यात आले होते. तथापि दिनांक २० मार्च २०२६ अखेर राज्याकरीता दिलेल्या नविन तुती लागवड नोंदणीचा लक्षांक पुर्तता फक्त ३१% झालेली असल्याने वरील संदर्भ क्र ७ चे शासन निर्णयान्वये **"महारेशीम**

**अभियान" २०२६** राबविण्यास दिनांक ०५-०४-२०२६ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. तेंव्हा राज्याचा निर्धारीत लक्षांक साध्य करणे करीता राज्यभरात मोठया प्रमाणात नविन तुती लागवड नाव नोंदणी शिबीरे नियोजीत करून दिनांक ०५-०४-२०२६ पर्यंत आपणांस दिलेला नविन तुती लागवडीचा लक्षांक पुर्ण करावा.

संदर्भिय शासन निर्णय क्र. ३ अन्वये महारेशीम अभियान- २०२६ राबविण्यासाठी संदर्भाधिन दिनांक २२ डिसेंबर २०१८ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे गठीत केलेल्या समित्या, अभियान राबविण्यासाठीच्या मागदर्शक सुचना व कार्यपध्दती जशास तशा लागू राहतील.

सोबत - शासन निर्णय

विनय मुन (भा.प्र.से)
संचालक (रे.)
रेशीम संचालनालय, नागपूर

**प्रतीलीपी माहितीस्तव**

कक्ष अधिकारी,रेशीम कक्ष, वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबंई-३२.